खाजगी माहिती तंत्रज्ञानांच्या पात्रतेचे
निकष आणि अटी व शर्तीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन शुध्दीपत्रक क्र.आयटीपी-२००५/प्र.क्र.१३२७ /उद्योग-२
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक:- २६ मे, २००६

वाचावे:- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग,क्र.मुद्रांक-२०००/४२२९/ सीआर-१०६४/म.१, दिनांक ५ मे २००१

२) उद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई याचे आदेश क्र.मातं/ खाजगी/मातं- उद्यान / मुद्रांक शुल्क (११)/२००१/बी-२९७९५, दिनांक २१ जून, २००१

३) शासन निर्णय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, क्र.आयटीपी-२००३/ सीआर-३३११/उद्योग-७, दिनांक १२ जुलै, २००३

४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग,क्र.मुद्रांक-२००३/२००३/ प्र.क्र.४६२/म-१, दिनांक २९/१२/२००३

५) शासन निर्णय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, क्र.आयटीपी-२००५/ प्र.क्र.३९२३/उद्योग-७, दिनांक १० जून, २००५

६) शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र.आयटीपी-२००५/प्र.क्र.१०९७/उद्योग-२ दिनांक २४/११/२००५

## शुध्दीपत्रक

उपरोक्त संदर्भ क्र. ५ व ६ येथील उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्रमांक आयटीपी-२००५/प्र.क्र.३९२३/उद्योग-७, दिनांक १०/६/२००५ व शासन शुध्दीपत्रक क्र.आयटीपी-२००५/प्र.क्र.१०९७/उद्योग-२, दि-२४/११/२००५ मध्ये खाली नमूद केल्यानुसार दुरुस्ती तसेच जादा बाबी समाविष्ट करण्यात येत आहेत:-

अ) शासन निर्णय दिनांक १०/६/२००५ मधील मुद्दा क्रमांक २ कार्यप्रणाली येथे - बदल/समाविष्ट करावयाच्या बाबी:-

१) खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यान उभारणी बाबत दिनांक १०.०६.२००५ च्या शासन निर्णयात विहित करण्यात आलेल्या सर्व निकषांची पूर्तता विकासकाने केली असल्यास खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांना नोंदणी कायम स्वरुपात देण्यात येईल व त्यामध्ये माहिती तंत्रज्ञान उद्यानाच्या व्यवस्थापनेबाबतची व तेथे सुरु असलेल्या उद्योगांची (activities) सविस्तर माहिती दरवर्षी देणे तसेच कोणत्याही प्रकारचे बदल करावयाचे असल्यास त्याकरिता नोदणी अधिका-यांकडून पूर्व परवानगी घेणे विकासकावर बंधनकारक करण्यात येत आहे.

उद्योग संचालनालय
19 JUN 2006
I-2346

२) माहिती तंत्रज्ञान उद्यानाच्या इरादा पत्राची मुदत संपण्यापूर्वी तीन महिने आधी विकासकाने मुदतवाढीसाठी अर्ज करावयास हवा ही अट क्षमापित (condone)करुन माहिती तंत्रज्ञान उद्यानाच्या इरादा पत्राच्या विधीग्राहयतेची मुदत संपल्यापासून सहा महिने पर्यंतच्या कालावधीत प्राप्त झालेले मुदतवाढीचे अर्ज गुणवत्तेनुसार विचारात घेऊन त्यांना पुढील १ वर्षाकरिता मुदतवाढ देण्याचे अधिकार नोंदणी अधिका-यांना (विकास आयुक्त (उद्योग) यांना मुंबईमधील व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांना त्यांचे जिल्हयाकरीता) देण्यात येत आहेत.

त्याचप्रमाणे पूर्वी ३ वर्षे कालावधीसाठी देण्यात आलेल्या नोंदणीपत्राची ३ वर्षाची मुदत संपल्यानंतर सहा महिन्यांच्या कालावधीपर्यंत मुदतवाढीसाठी अर्ज केल्यास माहिती तंत्रज्ञान उद्यानाच्या इरादा पत्र /नोंदणी प्रमाणपत्राची मुदत संपण्यापूर्वी तीन महिने आधी विकासकाने मुदतवाढीसाठी अर्ज करावयास हवा ही अट क्षमापित (condone) करुन त्यांना कायमस्वरुपी नोंदणी देण्यात येईल.

३) ज्या माहिती तंत्रज्ञान उद्यानास दि.१०/६/२००५ च्या आदेशानुसार कमीत कमी ६०% बांधकाम क्षेत्र माहिती तंत्रज्ञान उद्योगांसाठी व जास्तीत जास्त ४०% बांधकाम क्षेत्र पूरक सेवासुविधासाठी वापरण्याची नोंदणी दिली आहे व अशा माहिती तंत्रज्ञान उद्यानांना अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक देय आहे त्या माहिती तंत्रज्ञान उद्यानांना अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकानुसार बांधकाम केल्यावर एकूण बांधकामाच्या (Overall) ८०% व २०% याप्रमाणाची पूर्तता करण्यासाठी नोंदणी प्रमाणपत्रास मुदतवाढ देण्यात येईल. हा मुदतवाढ, मुदतवाढ दिल्याच्या तारखेपासून १ वर्षाकरिता किंवा त्यांच्या नोंदणीची मुदत संपलेल्या तारखेपासून दोन वर्षाकरिता यामधील जे अधिकचे असेल त्या कालावधीसाठी देण्यात येईल. या कालावधीमध्ये त्यांच्याकडून एकूण बांधकाम क्षेत्रफळाच्या ८० टक्के व २० टक्के याप्रमाणाची पूर्तता करण्यात येईल अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र घेण्यात येईल. याबाबतची योग्य ती अंमलबजावणी इरादापत्र/ नोंदणी देणा-या सक्षम अधिका-यांनी करावी.

४) कार्यान्वित असलेल्या नोंदणीकृत माहिती तंत्रज्ञान घटकास माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२००३ अन्वये स्वतःच्या माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यान उभारण्याकरिता परवानगी देण्यात येईल. त्याचप्रमाणे त्यास खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानातील माहिती तंत्रज्ञान उद्योगांना देय असलेली मुद्रांकशुल्क माफीची सवलत वगळून सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान उद्यानातील माहिती तंत्रज्ञान घटकाना देय असलेल्या इतर सर्व सवलतींचा लाभ देण्यात येईल. मात्र, त्याने खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानाकरिता आवश्यक असलेल्या प्रचलित निकषांची पूर्तता करणे अनिवार्य राहील व पुढील अंमलबजावणी सक्षम अधिका-यांनी करावी.

**ब) शासन शुध्दीपत्रक दि.२४/११/२००५ मध्ये बदल / समाविष्ट करावयाच्या बाबी:-**

१) ज्या माहिती तंत्रज्ञान उद्यानांनी इरादापत्र / नोंदणीपत्र घेतांना १००% बांधकाम क्षेत्र माहिती व तंत्रज्ञान घटकांकरिता वापरण्याचे प्रस्तावित केले आहे. अशा माहिती तंत्रज्ञान उद्यानांनी इरादापत्र / नोंदणीपत्राची मुदत संपल्यानंतर पुढील मुदतवाढीसाठी संपर्क साधल्यास शासन निर्णय दि.२४.११.२००५ नुसार एकूण ८०% बांधकाम क्षेत्र (अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांकासह अनुज्ञेय असलेल्या बांधकाम क्षेत्रासह ) माहिती व तंत्रज्ञान उद्योगांसाठी व उर्वरित २०% पूरक सेवा सुविधांसाठी वापरणे बंधनकारक राहील.

२) दिनांक २४.११.२००५ च्या शासन निर्णयात खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानातील ८०% बांधकाम क्षेत्र माहिती तंत्रज्ञान उद्योग घटकांसाठी व जास्तीत जास्त २०% बांधकाम क्षेत्र पूरक सेवासुविधांसाठी वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच त्यामध्ये २०% बांधकाम क्षेत्रफळात अंतर्भाव करावयाच्या चार सेवा सुविधांची माहिती देण्यात आली आहे. त्यात खालील आणखी सात सेवा सुविधांचा अंतर्भाव करण्यात येत आहे.

१) बँकिंग सेवा
२) मेडीकल स्टाअर्स / डिस्पेंसरी
३) डिपार्टमेंटल स्टोअर्स
४) ॲम्युझमेंट
५) कम्युनिकेशन सेंटर
६) कॉन्फरन्स ॲन्ड कन्व्हेंशन सेंटर
७) ट्रॅव्हल एजन्सी

३) दि. २४/११/२००५ च्या शासन निर्णयानुसार खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानातील ८०% बांधकाम माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी व २०% पूरक सेवा सुविधांसाठी वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. तथापि खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांच्या विकासकांना केंद्र शासनाच्या इंडस्ट्रीयल पार्क योजनेचा लाभ [illegible] त्यात १०% क्षेत्र व्यापारी वापरासाठी असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांच्या बांधकाम क्षेत्रफळाचे प्रमाण खालीलप्रमाणे ठेवण्यात येत आहे:-

एकूण बांधकाम क्षेत्रफळापैकी

अ) माहिती तंत्रज्ञान उद्योगांसाठी कमीत कमी ८०% बांधकाम क्षेत्र (BUA)

ब) पूरक सेवासुविधांसाठी मान्य केलेल्या २०% बांधकाम क्षेत्रापैकी (BUA)

ब(१) पूरक सेवासुविधांसाठी निम्मे बांधकाम क्षेत्र ( ५०%) (BUA) म्हणजेच एकूण बांधकाम क्षेत्रफळापैकी १०%

ब(२) माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित व्यापारी प्रयोजनासाठी जास्तीत जास्त निम्मे बांधकाम क्षेत्र ५०%) (BUA )म्हणजेच एकूण बांधकाम क्षेत्रफळापैकी १०%

याबाबतची योग्य ती अंमलबजावणी इरादापत्र/नोंदणी देणा-या सक्षम अधिका-यांनी करावी.

४) शासन निर्णय दिनांक २४/११/२००५ अन्वये खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानातील एकूण बांधकाम क्षेत्रफळाच्या किमान ८०% बांधकाम माहिती तंत्रज्ञान उद्योगाकरिता व २०% पुरक सेवासुविधासाठी वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यापूर्वी विहित केलेल्या निकषानुसार खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांनी एकूण बांधकामाच्या ६०% बांधकाम माहिती तंत्रज्ञान उद्योगांसाठी व ४०% पूरक सेवासुविधांसाठी वापरण्याचे प्रमाण ठरविण्यात आले होते. त्यामुळे ज्या खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांनी दि.२४/११/२००५ पूर्वी इरादा पत्र घेतले असेल व त्यात १००% बांधकाम क्षेत्र माहिती तंत्रज्ञान उद्योगांसाठी वापरण्याचे नमूद केले असून सुध्दा प्रत्यक्षात एकूण बांधकाम क्षेत्रापैकी ६०% बांधकाम माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी व ४०% बांधकाम

पूरक सेवासुविधांसाठी वापरले असेल व हया ६० व ४० टक्के प्रमाणाचा इरादापत्रांमध्ये बदल करण्यासाठी विनंती केली, तर अशी प्रकरणे नियमित करण्यात येतील. त्याबाबतची योग्य ती अंमलबजावणी इरादापत्र / नोंदणी देणा-या सक्षम अधिका-याने करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

छासुअग्निहोत्री

( छा. सु. अग्निहोत्री )
कार्यासन अधिकारी

प्रत:-

१) प्रधान सचिव, महसूल पुर्नवसन विभाग, मंत्रालय,मुंबई.
२) सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
३) सचिव, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई-३२
४) [illegible]
५) मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
६) मा.राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
७) आयुक्त, महानगरपालिका ( सर्व )
८) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, मुंबई-४०००५१
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पूर्व), मुंबई.
१०) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई.
११) विभागीय आयुक्त,पुणे /नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती/मुंबई
१२) महानिरीक्षक, नोंदणी व नियंत्रक, मुद्रांक शुल्क, पुणे
१३) निमंत्रक, उद्योग मित्र, मुंबई
१४) अधिक्षकीय उद्योग अधिकारी (माहिती तंत्रज्ञान), उद्योग संचालनालय,मुंबई.३२
१५) संचालक, सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क्स ऑफ इंडिया, पुणे
१६) उप महानिरीक्षक, मुद्रांक शुल्क, मुंबई
१७) उद्योग विभागातील सर्व सह सचिव / उप सचिव / कक्ष अधिकारी
१८) कक्ष अधिकारी (म-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई
१९) निवड नस्ती (उद्योग ७)

---

11559

एच-626